# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
कृषि नगर, वसमत रोड,
परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

सत्यमेव जयते

| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
|---|---|---|---|
| वेबसाईट | : www.vnmkv.ac.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५,२२३५८२ |


संदर्भः- १. महाराष्ट्र शासन अधिसुचना क्र.कृषिआ-१६१३/प्र.क्र.१९१/१६-ए दिनांक २९ जानेवारी, २०१८
२. महाराष्ट्र शासन, शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण २३१८/प्र.क्र.३/का.१७ दिनांक ११ ऑगस्ट, २०२२
३. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र.२०२४/सं.क्र.४०६/आस्था-३/ दिनांक ०४-०१-२०२४
४. विद्यापीठ शुध्दीपत्रक जा.क्र.सं.क्र.४०६/आस्था-३/३४०८ दिनांक १०-०७-२०२४

**कृषि सहायक कर्मचा-यांना विद्यापीठ कर्मचारी सेवाप्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य करणे बाबत...**

## प रि प त्र क

**जा.क्र.२०२५/सेप्रप-३८वी/आस्था-३/**
**दिनांक ०५-०६-२०२५**

संदर्भ क्रमांक १ वरील अधिसुचनेनुसार संदर्भ क्रमांक ३ वरील विद्यापीठ परिपत्रकान्वये, विद्यापीठ सेवेमध्ये गट-क मधील कृषि सहायक पदावर (सरळसेवा किंवा पदोन्नती) नियुक्त होणा-या कर्मचा-यांना विद्यापीठ कर्मचारी सेवाप्रवेशोत्तर परिक्षा विहीत कालावधीत उत्तीर्ण होणे अथवा शासन नियमानुसार सुट मिळविणे अनिवार्य राहिल असे परिपत्रकाव्दारे कळविण्यात आलेले आहे.

संदर्भ क्रमांक १ वरील अधिसुचनेनुसार, कृषि व पदुम विभागाच्या अंतर्गत असणा-या कृषि आयुक्तालयामधील कृषि सहायक पदाबाबत 'कृषि सहायक' गट-'क' (सेवाप्रवेश) नियम-२०१८ लागु करण्यात आले आहेत. सदर नियमातील नियम क्रमांक ५ नुसार कृषि सहायक पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार आवश्यक करण्यात आलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण केली नसेल किंवा उत्तीर्ण होण्यापासुन सुट मिळाली नसेल तर, सदर परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

सबब संदर्भ क्रमांक ४ वरील विद्यापीठ परिपत्रकामध्ये सुधारणा करुन, विद्यापीठामधील वर्ग-४ मधुन पदोन्नतीव्दारे अथवा सरळसेवेने कृषि सहायक या पदावर रुजु झालेल्या कर्मचा-यांना पुढील कोणत्याही आर्थिक लाभासाठी/पदोन्नतीसाठी विद्यापीठ कर्मचारी सेवाप्रवेशोत्तर परिक्षा विहीत कालावधीत उत्तीर्ण होणे अथवा शासन नियमानुसार सूट मिळविणे अनिवार्य राहिल, सदरचे परिपत्रक संदर्भ क्रमांक ०३ वरील विद्यापीठ परिपत्रक प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन लागु राहील.

**मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने,**

(पु.को.काळे)
कुलसचिव

**प्रतिलिपीः** संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/ संचालक संशोधन/ संचालक विस्तार शिक्षण/ सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण)/ विद्यापीठ अभियंता/ नियंत्रक, वनामकृवि, परभणी *यांना देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक आपल्या अधिनिस्त कार्यालयातील कृषि सहायक यांच्या निदर्शनास आणून द्यावे.*

**प्रत :**

१. मा. कुलगुरु यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.
२. प्रभारी अधिकारी, मध्यवर्ती संगणक केंद्र, परभणी *यांना देवून कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक* कृषि सहायक कर्मचा-यांना विद्यापीठ कर्मचारी सेवाप्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य करणे बाबत' *या सदराखाली विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.*